शनिवार दि. १९ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पूरसंरक्षणाच्या भिंतींच्या निविदांनाच ‘ब्रेक; पाच महिन्यांच्या विलंबावर चौकशीची मागणी!

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या विविध कामांच्या ई-निविदा प्रक्रियेतील तांत्रिक छाननी दीर्घकाळ प्रलंबित असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून निविदा प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याची मागणी आम आदमी पक्षाचे जालना तालुकाध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जालना यांच्या कार्यालयामार्फत विविध पूरसंरक्षणाच्या कामांसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यापैकी काही निविदांची बोली उघडण्याची प्रक्रिया एप्रिल २०२६ मध्ये, तर काही कामांची निविदा प्रक्रिया मे २०२६ मध्ये झाली असल्याचे उपलब्ध निविदा नोंदींवरून दिसते. उदाहरणार्थ, गायत्री देवी मंदिर/शितळा माता मंदिराजवळील सीना नदीवरील कामाची निविदा ९ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झाली आणि २० एप्रिल २०२६ रोजी बोली उघडण्यात आली होती. या कामाची अंदाजित किंमत सुमारे ४२.७२ लाख रुपये असून कामाचा कालावधी १८० दिवस आहे.

दरम्यान, निवेदनात नमूद केलेल्या अन्य कामांमध्ये कुंभेफळ साठवण तलावाच्या डाउनस्ट्रीम भागातील वाकी नदीवरील संरक्षण भिंत, उज्जैनपुरीजवळील भोरडी नाल्यावरील संरक्षण भिंत तसेच मांजरगावजवळील दूधना नदीवरील संरक्षण भिंत आणि बाठण खुर्दजवळील दूधना नदीवरील संरक्षण भिंतीचा समावेश आहे. सुभाष बोर्डे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात २० एप्रिल २०२६ पासून काही निविदा प्रक्रियेतील तांत्रिक छाननी अद्याप पूर्ण झाली नसल्याचा दावा केला आहे. त्यामुळे जवळपास पाच महिन्यांचा कालावधी उलटूनही निविदा प्रक्रियेचा पुढील टप्पा का गाठला गेला नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. निविदा प्रक्रियेतील विलंबाबाबत संबंधित विभागाकडून लेखी स्पष्टीकरण मागवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रत्येक निविदेची तसेच सध्याची स्थिती स्वतंत्रपणे तपासावी, अशीही मागणी आहे. निवेदनात केवळ निविदेच्या सद्यस्थितीची माहिती घेण्यापुरती मागणी न करता संबंधित कार्यालयीन नोंदी तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये , , , , नोटशीट आणि इतर संबंधित कागदपत्रांचा समावेश आहे.

सर्व निविदाकारांची पात्रता निविदेतील अटी व लागू शासन नियमांनुसार समान निकषांवर तपासण्यात आली आहे का, कोणत्याही निविदाकाराला अनुचित लाभ मिळाला आहे का आणि प्रक्रियेत कोणत्याही अधिकारी अथवा संबंधित व्यक्तीकडून हस्तक्षेप झाला आहे का,



याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात विशिष्ट कंत्राटदारांशी संबंधित पूर्वीच्या चर्चांचा उल्लेख करण्यात आला असून, श्री. अतुल निकम आणि सार्थक यांच्याशी संबंधित कंत्राटी कामांबाबत पूर्वी प्रसिद्ध झालेल्या वृत्तांच्या कात्रणाही जोडल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, या बाबींवर कोणताही अंतिम निष्कर्ष काढण्याऐवजी संपूर्ण वस्तुस्थितीची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी भूमिका निवेदनकर्त्यांनी घेतली आहे.

त्यामुळे संबंधित निविदांमध्ये पात्रता तपासणी, तांत्रिक मूल्यांकन आणि पुढील आर्थिक लिफाफा उघडण्याची प्रक्रिया नियमांनुसार झाली आहे का, याकडे आता लक्ष लागले आहे.

उपलब्ध सार्वजनिक निविदा नोंदींच्या पडताळणीत कामासाठी २०२६१३००१३८१ असल्याचे दिसते. या निविदेची प्रसिद्धी ५ मे २०२६ रोजी झाली असून बोली सादर करण्याची अंतिम तारीख १३ मे आणि बोली उघडण्याची तारीख १५ मे २०२६ असल्याची नोंद आहे. अंदाजित निविदा किंमत सुमारे ४२.७७ लाख रुपये असल्याचेही नोंदविले आहे.

त्याचवेळी २०२६१३००१३६१ हा मांजरगाव, ता. बदनापूर येथील दूधना नदीवरील कामाशी संबंधित असल्याचे उपलब्ध निविदा नोंदी दर्शवतात. या निविदेची प्रसिद्धी ५ मे आणि अंतिम तारीख १३ मे २०२६ असल्याचे नोंद आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर होणाऱ्या मूळ निवेदनात नमूद करताना अधिकृत महाटेंडर्स नोंदीशी त्याची पुन्हा पडताळणी करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पावसाळ्यातच संरक्षण भिंतींची कामे रखडल्याचा सवाल ही केवळ नियमित बांधकामाची कामे नसून नदी, नाला आणि पूरप्रवण भागातील नागरिकांच्या संरक्षणाशी संबंधित कामे आहेत. अतिवृष्टीच्या काळात नदीपात्रातील पाणी वाढल्यास घरांमध्ये, शेतीमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी पाणी शिरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संरक्षणात्मक कामांच्या निविदा प्रक्रियेत अनावश्यक विलंब होऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया नियमानुसार असल्यास ती विनाकारण प्रलंबित न ठेवता कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी आणि तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या निविदाकारांचे आर्थिक लिफाफे निविदा अटी व शासन नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने उघडावेत, अशी मागणी बोर्डे यांनी केली आहे.

विलंबाची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

भविष्यात अतिवृष्टी अथवा पूरस्थिती निर्माण झाल्यास संरक्षणात्मक कामे वेळेत पूर्ण न झाल्याने नागरिकांच्या जीवित किंवा मालमत्तेला धोका निर्माण झाला, तर या विलंबाची प्रशासकीय कारणे आणि जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

चौकशीअंती अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**२१ सप्टेंबरला आंदोलनाचा इशारा**

सदर प्रकरणात तातडीने कार्यवाही करून संबंधित विभागाकडून अहवाल मागवावा आणि चौकशीची दिशा स्पष्ट करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच निर्धारित कालावधीत योग्य कार्यवाही न झाल्यास २१ सप्टेंबर २०२६ रोजी लोकशाही व कायदेशीर मार्गाने शांततामय आंदोलन अथवा निदर्शने करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय तसेच लघु पाटबंधारे विभागाकडून या निविदांची सद्यस्थिती, तांत्रिक छाननीला लागलेला कालावधी, विलंबाची कारणे आणि पुढील कार्यवाही याबाबत काय भूमिका घेतली जाते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## गौरी पूजनाच्या दिवशी घरकुल लाभार्थ्यांच्या घरी ‘आशीर्वादाचा दिवा’

**जालना – प्रतिनिधी**



सेवा संकल्प अभियान व ‘स्वच्छता ही सेवा–२०२६’ या अभियानांतर्गत जालना जिल्हा परिषदेच्या वतीने गौरी पूजनाच्या दिवशी घरकुल लाभार्थ्यांच्या घरी ‘आशीर्वादाचा दिवा’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून लाभार्थ्यांच्या नव्या घरात आनंद, समाधान आणि समृद्धीचा प्रकाश पोहोचविण्यासोबतच समाजातील वंचित घटकांप्रती संवेदनशीलता आणि सेवाभावाचा संदेश देण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात सेवा संकल्प अभियानाचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून घरकुल योजनेचा लाभ मिळालेल्या कुटुंबांच्या घरी भेट देऊन ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करण्यात आला.

या उपक्रमादरम्यान घरकुल लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या जीवनातील नव्या घराचे महत्त्व जाणून घेण्यात आले. तसेच स्वच्छता, आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक सहभाग याबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणा तसेच स्थानिक नागरिकांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी उपक्रमांना जनसहभागाची जोड देण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

## तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत सेठ ई बी के उर्दु विद्यालयाने मारली बाजी



**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथील सेठ ई बी के उर्दु विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय इंग्रजी वकृत्व () स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. तालुकास्तरीय स्पर्धेतील इयत्ता ५ वी ते ६ वी गटात जुनेरा मोबीन सय्यद हिने प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. तसेच इयत्ता ७ वी ते ८ वी गटात शिफा अमर पठाण हिने तृतीय क्रमांक संपादन करून उल्लेखनीय यश मिळविले. तसेच इयत्ता ९ वी ते १० वी गटात सबा रहेमान कुरेशी हिने प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली.

तीन्ही विद्यार्थिनींच्या या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, परिश्रम आणि विद्यार्थिनींची मेहनत महत्त्वाची ठरली. शिक्षक शेख साबेर यांनी विद्यार्थिनींना *(पान २ वर)*

## गरविवारपासून जालन्यात राष्ट्रीय संत गोविंद देवगिरीजी यांची भागवत कथा

**जालना – प्रतिनिधी**

भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने जालन्यातील मंठा रोडवरील आईसाहेब लॉन्समध्ये २० ते २६ सप्टेंबरदरम्यान दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत आयोध्यातील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास मथुराचे उपाध्यक्ष प. पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाची त्याच्यात तयारी सुरू असून, रविवारी शोभायात्रेने या ज्ञान यज्ञाला सुरुवात होणार आहे.



. पूज्य स्वामी श्री गोविंददेवगिरीजी महाराज हे २० सप्टेंबर रोजी श्रीमद्भागवत कथा महात्म्य, कथारंभ, मुनिजिज्ञासा आणि श्री नारद–व्यास संवाद, २१ सप्टेंबर रोजी श्री शुक–परीक्षित चरित्र, मनु–कर्दम चरित्र आणि कपिलोपदेश,२२ सप्टेंबर रोजीसती चरित्र, ध्रुवाख्यान, भरत चरित्र, अजामिलोद्धार आणि नृसिंह अवतार, २३ सप्टेंबर रोजी गजेंद्र मोक्ष, श्री वामन अवतार, श्रीराम चरित्र आणि श्रीकृष्ण जन्मोत्सव, २४ सप्टेंबर रोजी नंदोत्सव, श्रीकृष्ण बाललीला, कुमारलीला आणि श्री गोवर्धन पूजा, २५ सप्टेंबर रासक्रीडा, कंसवध आणि श्रीकृष्ण–रुक्मिणी विवाह सोहळा यावर विवेचन करणार असून, २६ सप्टेंबर रोजी सांगतादिनी द्वारका लीला, श्री सुदामा पूजन, भागवत धर्म, उद्धवापदेश आणि कथेची पूर्णाहुती होईल.

कथेची तयारी अंतिम टप्प्यात असून, यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. या आध्यात्मिक सोहळ्याचा सर्व भाविकांनी सहपरिवार लाभ घ्यावा, असे आवाहन भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

## उत्सवाचा आनंद नियमांच्या चौकटीत राहूनच द्विगुणीत करावा-विक्रम साळी

### गणेश महासंघाच्या श्रींची अपर पोलीस अधीक्षकांच्या हस्ते आरती

**जालना – प्रतिनिधी**

जालना शहराला गणेशोत्सवाची मोठी आणि आदर्श परंपरा लाभली आहे. सर्व गणेश मंडळांनी व नागरिकांनी कायद्याचे पालन करून हा उत्सव शांततेत, सौहार्दाच्या वातावरणात आणि सुरक्षिततेची खबरदारी घेत साजरा करावा. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, नागरिकांचे आणि मंडळांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी येथे बोलताना केले.



श्री गणेश महासंघाच्या मामा चौकातील मध्यवर्ती संपर्क कार्यालयाला अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि सदर बाजार ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी दोन्ही अधिकाऱ्यांच्या हस्ते श्रींची मनोभावे आरती करण्यात आली.

पोलीस निरीक्षक संदीप भारती म्हणाले की, उत्सवाच्या काळात रहदारीला अडथळा होणार नाही तसेच ध्वनीप्रदूषणाचे नियम पाळले जातील, याकडे गणेश मंडळांनी स्वतःहून लक्ष द्यावे. कोणत्याही संशयास्पद हालचाली किंवा समस्येबाबत तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा; पोलीस दल जनतेच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर आहे.

श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल यांनी महासंघाच्यावतीने अधिकाऱ्यांचे स्वागत केले. ते म्हणाले, शहरात शांतता आणि सलोखा राखण्यासाठी महासंघाशी संलग्न सर्व मंडळे प्रशासनाला पूर्ण सहकार्य करतील. महासचिव भूषण यादव यांनी पोलीस प्रशासनाच्या सर्व नियमावलींचे काटेकोर पालन करूनच *(पान २ वर)*

### जालना येथे पीएम विश्वकर्मा लाभार्थी मेळावा

## पारंपरिक कारागिरांनी उद्योग विस्तारासाठी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा : अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जालना जिल्ह्यातील पीएम विश्वकर्मा योजना लाभार्थी मेळाव्याचे आयोजन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. मेळाव्याचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर, जिल्हा उद्योग केंद्राचे उपआयुक्त योगेश सारणीकर, एमएसएमईच्या सहायक संचालिका श्रीमती सुनिता, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी तथा पीएम विश्वकर्मा योजनेचे सदस्य सचिव रुपेश आचारी, ज्येष्ठ पर्यवेक्षक विष्णू कायंदे तसेच मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

मेळाव्याच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी रुपेश आचारी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना पीएम विश्वकर्मा योजनेची उद्दिष्टे, लाभार्थ्यांची पात्रता, योजनेअंतर्गत मिळणारे प्रमाणपत्र, टूलकिट तसेच उद्योग सुरू करण्यासाठी किंवा उद्योगवाढीसाठी बँकांमार्फत उपलब्ध होणाऱ्या कर्ज सुविधांची माहिती दिली.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते पीएम विश्वकर्मा योजनेतील लाभार्थी उद्योजकांना टूलकिट तसेच कर्ज मंजुरी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात श्री. मिसाळ यांनी पारंपरिक कारागिरांच्या उद्योजकीय प्रवासाचे कौतुक केले. कारागिरांनी उद्योगाचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा तसेच आपल्या उत्पादनाचे प्रभावी ब्रँडिंग करून बाजारपेठेत स्वतंत्र ओळख निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी पीएम विश्वकर्मा उद्योजकांनी आपला सिबिल/क्रेडिट स्कोअर चांगला राखल्यास बँकांकडून कर्जपुरवठा सुलभ होण्यास मदत होऊ शकते, असे सांगितले.

मेळाव्यात पीएम विश्वकर्मा योजनेच्या काही लाभार्थी उद्योजकांनी आपली यशोगाथा व मनोगत व्यक्त केले. पारंपरिक *(पान २ वर)*

# टेंभुर्णीत वारंवार वीज खंडित; अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांचा संताप

## गणेशोत्सवात गाव अंधारात; संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून दोषींच्या निलंबनाची ग्रामस्थांची मागणी

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

गणेशोत्सवाचा उत्साह सुरू असतानाच टेंभुर्णी गावात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अचानक वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढल्याने गणेशोत्सवातील कार्यक्रम, नागरिकांची दैनंदिन कामे तसेच ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर संबंधित अधिकारी आणि लाईनमन यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. वीजपुरवठ्याच्या समस्येबरोबरच महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीवरच ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. संबंधित अधिकारी मुख्यालयाच्या परिसरात वास्तव्यास न राहता जालना येथून ये-जा करीत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. या आरोपाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे पडताळणी करून संबंधित अधिकाऱ्याची मुख्यालयातील उपस्थिती, कर्तव्यावरील उपलब्धता आणि तक्रारींवरील प्रतिसाद याबाबत तपासणी करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. गावातील गणेश मंडळांचे कार्यक्रम, धार्मिक उपक्रम आणि नागरिकांची वर्दळ सुरू असताना अचानक अंधार पडत असल्याने आयोजक तसेच ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र अनेक वेळा तातडीने प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे वीज जाणे ही समस्या असली तरी वीज गेल्यानंतर तक्रारीचे निराकरण करण्यासाठी यंत्रणा किती तत्पर आहे, हा त्याहून गंभीर प्रश्न असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संबंधित अधिकारी मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास आहेत की जालना येथून ये-जा करतात, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आणि वरिष्ठ अभियंत्यांनी टेंभुर्णी येथे प्रत्यक्ष भेट देऊन वीजपुरवठ्याची स्थिती, वारंवार बिघाड होण्याची कारणे, दुरुस्ती पथकाची उपलब्धता आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद याची पाहणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

वीजपुरवठ्याबाबत तक्रार करण्यासाठी संपर्क साधताना नागरिकांशी योग्य पद्धतीने संवाद साधला जात नसल्याचा, तसेच उद्धटपणे वागल्याचा आरोपही काही ग्रामस्थांनी केला आहे. या तक्रारींचीही वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ''अधिकारी कोणाचाही असो, नागरिकांच्या मूलभूत सुविधांपेक्षा कोणीही मोठे नाही,'' अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्याचे राजकीय नेत्यांशी जवळचे संबंध असल्याचा किंवा मोठ्या व्यक्तींचा धाक दाखविला जात असल्याचा दावा काही ग्रामस्थांकडून केला जात असेल, तर त्याचीही निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने वरिष्ठ प्रशासनाने त्याची वस्तुनिष्ठ पडताळणी करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**वृद्ध ग्रामस्थांचा संताप; 'समस्या सांगायच्या कुणाला?'**

टेंभुर्णीतील परिस्थितीबाबत एका वृद्ध ग्रामस्थाने वृत्तप्रतिनिधीशी बोलताना गावातील राजकीय नेतृत्वाच्या भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली. ''टेंभुर्णीच्या समस्या सांगायच्या कुणाला? गावातील राजकीय नेते अगदी गप्प आहेत. त्यांना स्वतःच्या गावाचाही विसर पडल्यासारखी परिस्थिती आहे. आपण या गावचे नेते आहोत, याची जाणीव त्यांना आहे की नाही, असा प्रश्न पडतो,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. गावातील समस्या सोडवण्यासाठी एखादी बाहेरील व्यक्ती किंवा अधिकारी येऊन प्रश्न सोडवेल, याची वाट पाहण्याऐवजी गावातील राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी एकत्र येऊन प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. ''गावात किती समस्या आहेत, नागरिकांना किती अडचणींचा सामना करावा लागतो, याचा विचार करण्यासाठी गावातील नेते आणि समाजसेवकांनी पुढे यायला हवे.

मात्र अनेक प्रश्न असतानाही त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. सणासुदीच्या काळातही वीज कधी जाते आणि कधी येते, याची शाश्वती नसते. आमच्यासारख्या वृद्ध माणसांना यामुळे किती त्रास होतो, याची साधी कल्पनाही संबंधितांना नसल्याचे दिसते,'' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**गावातील नेतृत्वाने एकत्र येण्याची गरज**

टेंभुर्णीतील वीजपुरवठ्याचा प्रश्न केवळ महावितरणपुरता मर्यादित न ठेवता गावातील लोकप्रतिनिधी, राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन तो वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची गरज असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. वीजपुरवठा हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे वारंवार होणाऱ्या वीजखंडिततेचे मूळ कारण शोधून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महावितरणने तांत्रिक पाहणी करणे आवश्यक आहे. जुन्या वाहिन्या, ट्रान्सफॉर्मरवरील वाढलेला भार, तांत्रिक बिघाड, देखभालीचा अभाव किंवा अन्य कारणांमुळे समस्या निर्माण होत असल्यास त्याचे निराकरण करणे गरजेचे आहे. 'फक्त वीज आली म्हणजे प्रश्न सुटला असे नाही'

ग्रामस्थांच्या मते, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर काही वेळाने वीज सुरू होणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. वीज का जाते, वारंवार का जाते आणि प्रत्येक वेळी दुरुस्तीसाठी एवढा वेळ का लागतो, याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे. विशेषतः गणेशोत्सव, सण-उत्सव आणि रात्रीच्या वेळी गावातील वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरणने स्वतंत्र नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**वरिष्ठ अधिकारी टेंभुर्णीत येणार का?**

ग्रामस्थांनी केलेल्या आरोपांची वस्तुनिष्ठ चौकशी करण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी टेंभुर्णीला प्रत्यक्ष भेट देण्याची मागणी होत आहे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची कर्तव्यावरील उपस्थिती, नागरिकांच्या तक्रारींवरील प्रतिसाद, वीजपुरवठा खंडित होण्याची वारंवारता आणि दुरुस्तीची कार्यपद्धती याची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ''गणेशोत्सवात गावाला अंधारात ठेवणाऱ्या कार्यपद्धतीची तात्काळ चौकशी करा.

दोष आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनासह योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करा,'' अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

आता महावितरणचे वरिष्ठ अधिकारी या तक्रारींची कितपत गांभीर्याने दखल घेतात, टेंभुर्णीतील वीजपुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करतात का आणि संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीबाबत करण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करतात का, याकडे टेंभुर्णी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# कायद्याचे अभ्यासक सर्वोच्च न्यायालयात का नाहीत?

भारतीय संविधानाला ७६ वर्षे पूर्ण झाली तरी एकाही प्रख्यात कायदेतज्ज्ञाची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झालेली नाही, अशी खंत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी नुकतीच व्यक्त केली आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात बोलताना त्यांनी संविधानाच्या अनुच्छेद १२४(३)(क) चा दाखला देत ही कायदेशीर तरतूद अद्याप अप्रयुक्त राहिल्याचे स्पष्ट केले. संविधानाच्या शिल्पकारांनी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि वकिलांव्यतिरिक्त नामवंत शिक्षणतज्ज्ञ व अभ्यासकांनाही सर्वोच्च न्यायालयात स्थान देण्याची स्पष्ट तरतूद करून ठेवली होती. मात्र केंद्र सरकार आणि न्यायाधीशांच्या निवड समितीने या महत्त्वाच्या तरतुदीकडे आजवर गांभीर्याने पाहिले नाही किंवा भारतीय कायदे अभ्यासकांमध्ये आवश्यक सखोलता नाही असा चुकीचा समज करून घेतला, असे न्यायमूर्ती भुयान यांनी नमूद केले. प्रख्यात कायदेतज्ज्ञांच्या गाढ अभ्यासामुळे आणि संशोधक वृत्तीमुळे न्यायव्यवस्थेची गुणवत्ता अधिक समृद्ध होऊ शकते, असे स्पष्ट करत त्यांनी अमेरिका, कॅनडा, ब्रिटन आणि केनिया यांसारख्या देशांची उदाहरणे दिली, जिथे प्राध्यापक व कायदेतज्ज्ञ सर्वोच्च पदांवर उत्तम कार्य करत आहेत.

या ऐतिहासिक विधानावर आपली स्पष्ट भूमिका मांडताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, ''संविधानातील तरतूद सात दशकांहून अधिक काळ कागदावरच राहणे हे आपल्या लोकशाही न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत दुर्दैवी आहे. संविधानाच्या चौकटीत राहून न्यायदानाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विविध क्षेत्रांतील कायदेपंडितांचे ज्ञान उपयोगात आणण्यासाठी ही तरतूद प्रत्यक्षात आणणे काळाची गरज आहे. केवळ सर्वोच्च न्यायालयातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आणि उच्च न्यायालयातही अशा निष्णात विधी अभ्यासकांना आणि प्राध्यापकांना न्यायदान प्रक्रियेत संधी मिळायला हवी. देशाचे कायदा मंत्री आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेने यावर तातडीने आणि गांभीर्याने विचार करून या अप्रयुक्त तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी ठोस पावले उचलली पाहिजेत.''

# श्रीमती जे.बी.के. विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी शहरातील नामांकित नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीमती.जे.बी.के.विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, सर्व प्रथम सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले, विद्यालयाचे सास्कृतिक कार्यक्रम प्रमुख एस. बी.बोरकर सर यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या



प्रसंगी नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जमिर शेख सर,हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, एस. बी. बोरकर, पर्यवेक्षक भिवसन ससाणे सर, विष्णु जाधव सर,हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.विद्यालयातील कु. गायत्री चव्हाण या विद्यार्थीनीने स्वातंत्र्य संग्रामात प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यां बद्दल माहिती विशद केली,तर काही विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर गीते सादर केले. प्रा. सुनील बनसोडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा दैदिप्यमान इतिहास मांडला.कार्यक्रमाचे सुत्र संचालन रविंद्र मोरे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेंद्र जगताप सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश इंगळे, क्रिडाप्रमुख कैलास भूतेकर, राजेश शेवाळे, समाधान कांबळे, दत्ता ऊखर्डे, दिनकर ऊखर्डे, वासुदेव क्षिरसागर प्रा. रामदास भांगे, प्रा.कैलास जाधव. प्रा. गजानन धोटे.प्रा.डॉ. आनंद जाधव,उज्वला आवटी, एफ. ए.शेख, मंजुषा भिलावेकर, माधुरी पाटील, ज्योतीताई जाधव, निशिगंधा राजपुत, विजया शिल्लार सुनील सकुंडे, राजुभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, दिपक देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# घरच्या घरी साकारला इकोफ्रेंडली गणपती; सृष्टी कोठावदेची कलाकृती ठरतेय आकर्षणाचा केंद्रबिंदू

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सव म्हटला की, घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाच्या आगमनाची लगबग सुरू होते. विविध आकारांच्या, आकर्षक रंगसंगतीच्या गणेशमूर्तींसह पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकडेही नागरिकांचा कल वाढताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर ॲड.शलाका कोठावदे यांच्या कुटुंबीयांनी घरच्या घरी साकारलेल्या इकोफ्रेंडली गणेशमूर्तीने यंदाच्या गणेशोत्सवात विशेष लक्ष वेधून घेतले आहे.

सध्या गणेशोत्सवात अनेक कुटुंबे बाहेरून गणेशमूर्ती आणून विधिवत प्रतिष्ठापना करतात. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडूनही विविध संकल्पनांवर आधारित गणेशमूर्ती साकारल्या जातात. मात्र, कोठावदे कुटुंबीयांनी याला एक वेगळा आणि पर्यावरणपूरक आयाम दिला आहे. बाजारातून तयार मूर्ती आणण्याऐवजी घरामध्येच इकोफ्रेंडली गणेशमूर्ती तयार करण्याचा उपक्रम त्यांनी राबविला आहे. या गणेशमूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे



मूर्ती तयार करण्यापासून तिच्यावर रंगकाम करण्यापर्यंतची प्रक्रिया घरच्या घरी करण्यात आली आहे. मूर्तीला अचूक आणि सुबक पद्धतीने रंग देत तिचे सौंदर्य खुलविण्यात आले आहे. त्यानंतर आकर्षक दागिने, अलंकार तसेच विविध सजावटीच्या साहित्याचा वापर करून गणरायाची मनोहारी सजावट करण्यात आली आहे. त्यामुळे ही मूर्ती केवळ पर्यावरणपूरकच नाही, तर कलात्मक दृष्ट्याही उठून दिसत आहे.

या सुंदर गणेशमूर्तीची निर्मिती ॲड.शलाका कोठावदे यांची सुकन्या सृष्टी कोठावदे हिने केली आहे. स्वतःच्या कल्पकतेतून आणि कलागुणांतून सृष्टीने गणेशमूर्तीला आकार दिला. त्यानंतर रंगकाम व सजावटीच्या माध्यमातून मूर्तीला आकर्षक स्वरूप प्राप्त करून दिले. लहान वयातच पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद असल्याचे पाहुणे व मित्रमंडळींकडून सांगितले जात आहे. गणेशोत्सवाच्या काळात कोठावदे कुटुंबीयांच्या घरी दर्शनासाठी येणारे पाहुणे, नातेवाईक आणि मित्रमंडळी या गणेशमूर्तीचे तसेच करण्यात आलेल्या सजावटीचे आवर्जून कौतुक करत आहेत. स्वतःच्या हाताने तयार केलेली गणेशमूर्ती, पर्यावरणपूरकतेचा विचार आणि कलात्मक सजावट यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळतो.

आजच्या काळात पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेता गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवात पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे महत्त्वाचे ठरत आहे. कोठावदे कुटुंबीयांनी घरच्या घरी इकोफ्रेंडली गणेशमूर्ती साकारून 'उत्सवही आनंदाचा आणि पर्यावरणाचीही जपणूक' असा संदेश दिला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमातून केवळ पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेशच दिला जात नाही, तर घरातील मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याबरोबरच पुढील पिढीमध्ये पर्यावरणाबाबतची जाणीव निर्माण करण्याचा आदर्शही समोर येतो. त्यामुळे कोठावदे कुटुंबीयांचा हा घरगुती इकोफ्रेंडली गणपती गणेशभक्तांसाठी आणि भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# AMD इंग्लिश स्कूल, सोमनाथ येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा



**जालना - प्रतिनिधी**

सोमनाथ, दि. १७ सप्टेंबर २०२६ : इंग्लिश स्कूल, सोमनाथ येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली डॉ. प्रा. दिलीप अर्जुने होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शन मा. डॉ. मंगला दिलीप अर्जुने यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक निशांत लालझरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी . ज्योती बगीनवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मा. संतोष कांबळे, अविनाश कांबळे , . अभिजीत भंडारे विजया उबाळे , संध्या कुबेर , मा. पुष्पा राऊत , मा. सरिता नाडे , मा. मोनिका बिष्ट तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे व शौर्याचे स्मरण करण्यात आले. मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि स्वातंत्र्याचे महत्त्व याविषयी माहिती देण्यात आली.

# टेंभुर्णीत ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

## गांधी चमन येथे ग्रामपंचायत अधिकारी जगदीश आढाव यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी येथे १७ सप्टेंबर २०२६ रोजी ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विविध ठिकाणी ध्वजारोहण करून उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य शासकीय ध्वजारोहण गांधी चमन येथे ग्रामपंचायत अधिकारी जगदीश आढाव यांच्या हस्ते पार पडले. ध्वजारोहणानंतर ग्रामपंचायत अधिकारी जगदीश आढाव यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास आणि हुतात्म्यांच्या बलिदानाची माहिती दिली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या लढ्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाल्याचे



त्यांनी सांगितले. सर्व ठिकाणी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी . सर्व गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे विस्तार अधिकारी रामकुमार खराडे, गौतम म्हस्के, चेअरमन रावसाहेब पाटील अंभोरे, ईसुब सौदागर, शारेख सिद्दीकी, रामराव मुळे, शिवाजी मुळे, रामकृष्ण उखर्डे, बाळू देशमुख, दिगंबर भिसे, अजिस बागवान, विक्रम उखर्डे, अनिल गायकवाड, योगेश गायमुखे, बाबासाहेब जमधडे, सुनील भाले, रामदास येथे पार पडले ध्वजारोहण

१ ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णीः प्रशासक जायभाये यांच्या हस्ते ध्वजारोहण.

३ टेंभुर्णी पोलीस ठाणेः सपोनि अविनाश राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण. देवगिरी सहकारी बँक टेंभुर्णीः डॉ. रमेश मोठे यांच्या हस्ते ध्वजारोहण.

४ ग्रामीण रुग्णालय टेंभुर्णीः वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमेश जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण. ५ जिल्हा परिषद शाळा टेंभुर्णीः मुख्याध्यापक गौतम चंदनशिवे यांच्या हस्ते ध्वजारोहण. धनवाई, उमेश वराडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, शिक्षकवृंद, माजी सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जालना शहर महानगरपालिका, जालना**

प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड, जुना जालना -४३१२०३, कार्यालय संपर्क क्रं. (०२४८२)-२३०३५०

Email ID- comcjalna@gmail.com Website-jalnamahaulb.maharashtra.gov.in

विभाग : सा. बा. जा. क्र. / जाशमनपा/४७५ दिनांक - १८-०९-२०२६

**ई- निविदा सुचना क्र. दिनांक,**

आयुक्त, जालना शहर महानगर पालिका, जालना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आणि त्यावर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगर पालिका, जालना कडुन महानगर पालिकेच्या निधी साल सन २०२६-२७ अंतर्गत (०१) कामांकरीता व्दिलीफाफा पध्दतीने, **B-1** स्वरुपात ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कालावधी दिनांक १८-०९-२०२६ दु. ४.०० ते दिनांक २६-०९-२०२६ सायं. ५.०० पर्यंत असुन सर्व कामे दिनांक १८-०९-२०२६ दु. ४.०० ते दिनांक २६-०९-२०२६ सायं ५ पर्यंत या वेळेत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास व डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहेत. निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार, जालना शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले असुन अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| शहर अभियंता | मुख्यलेखापरीक्षक | मुख्यलेखाधिकारी | आयुक्त |
|---|---|---|---|
| म.न.पा. जालना | म.न.पा. जालना | म.न.पा. जालना | म.न.पा. जालना |








जालना शहरातील ओळखल्या जाणाऱ्या मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींची सकाळ ची महाआरती , उद्योगपती जितेश तालुका सहपत्नी सौ रुचिता तालुका व सोबत संतोष तालुका यांच्या शुभहस्ते संपन्न संयकाळ ची महाआरती प्रसिद्ध उद्योगपती अरुण अग्रवाल पत्नी सरला अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी मंडळाच्या वतीने त्यांचे सत्कार करताना गणपती ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड सोबत मंडळ समिती, महामंत्री दर्शीत आबड, उपाध्यक्ष धीरज धारीवाल, मयूर सावजी,रमेश दलाल,संजय तालुका,अनुराग अग्रवाल,राहुल तालुका,सुनील अग्रवाल,श्रेणिक आबड ,संतोष अग्रवाल,आदी (छाया/जावेद तंबोली)

### परतूर नगरपालिका निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण होण्यास सुरुवात

# आ. बबनराव लोणीकरांच्या प्रयत्नांतून मंजूर करण्यात आलेल्या ४५ लाखां च्या निधीमधून विकासकामांचे भूमिपूजन

### दिलेला शब्द पाळणारे नेते बबनराव लोणीकरच; शहराचा संपूर्ण कायापालट करणार - राहुल लोणीकर

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर नगरपालिका निवडणुकीच्या काळात नागरिकांना दिलेल्या विकासकामांच्या आश्वासनांची पूर्तता आता प्रत्यक्षात सुरू झाली आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांतून परतूर शहरातील पवार कॉलनी येथील मारुती मंदिर सभा मंडप १० लक्ष, इंदिरानगर परिसरातील सिमेंट रस्ते बांधकाम २२ लक्ष , आंबेडकर नगर गाव भाग येथे स्मशानभूमी १५ लक्ष रु असे एकूण ४५ लाख रुपये किमतीच्या कामांचे भूमिपूजन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले



यावेळी बोलताना राहुल लोणीकर यांनी आमदार बबनराव लोणीकर यांनी जनतेला दिलेला शब्द कायम पाळला असल्याचे सांगितले. परतूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने निधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न आमदार बबनराव लोणीकर यांचे सुरू असून, आगामी काळात शहराचा संपूर्ण कायापालट करण्यासाठी विकासकामांना आणखी गती दिली जाईल, अशी ग्वाही राहुल लोणीकर यांनी दिली. परतूर शहराच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचा प्रयत्न केला जात असून, नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विकासाचा हा प्रवास सातत्याने सुरू राहणार असल्याचे यावेळी राहुल लोणीकर म्हणाले पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, शहरातील स्वच्छता शुद्ध पिण्याचे पाणी पथदिव्यांची व्यवस्था यासह नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी नगरपालिकेच्या माध्यमातून आपण कटिबद्ध असून, येणाऱ्या काळामध्ये मूलभूत प्रश्नसह शहराच्या सौंदर्य कारणाचा प्रश्न आपण हत्या घेणार असून या माध्यमातून शहराला सुंदर बनवणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी शहरातील मुख्य रस्ता रेल्वे लाईन उड्डाणपूल, स्मशानभूमी विकास, गणपती मार्ग, नगरपालिकेसाठी स्वतंत्र नवीन इमारत, शहरातील व परिसरातील नागरिकांची सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी नाट्यगृह, शादी खाना अनेक ठिकाणी सभागृह बांधलेले असून , आमदार लोणीकरांच्या या कामांच्या विश्वासावरच शहरातील नागरिकांनी परतुर शहराची ३५ वर्षे अबाधित असलेली सत्ता उलथवून टाकत भारतीय जनता पार्टीवर विश्वास दाखवत सत्ता हाती दिली निश्चितपणाने शहराचा संपूर्ण विकास आमदार लोणीकरांच्या माध्यमातून येत्या येत्या काळात पूर्ण होईल असा आशावाद *(पान २ वर)*

# टेंभूर्णी येथे पवार परिवाराची १५४ वर्षांची परंपरागत केळीच्या पानांची गौरी स्थापित; पाचव्या पिढीकडून वारसा कायम

**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी (ता. जाफ्राबाद):नवसाला पावणारी आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारी टेंभूर्णी येथील पवार परिवाराची परंपरागत केळीच्या पानांची गौरी या वर्षीही अत्यंत भक्तीमय वातावरणात स्थापित करण्यात आली आहे. जाफ्राबाद तालुक्यातील शिक्षक श्री. प्रमोद पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सुमारे १५४ वर्षांची ही अनोखी आणि ऐतिहासिक कौटुंबिक परंपरा या वर्षीही मोठ्या उत्साहात कायम ठेवली आहे.स्वप्नातील साक्षात्काराने झाली होती सुरुवातया अनोख्या परंपरेची सुरुवात पवार परिवाराचे पूर्वज स्व. भिमाजी लक्ष्मणराव पवार यांनी जाफ्राबाद तालुक्यातील डोलखेडा येथून केली होती. त्या काळी स्व. भिमाजीराव पवार यांना स्वप्नात महालक्ष्मीचा दृष्टांत (साक्षात्कार) झाला होता. ''तुम्ही दरवर्षी जुन्या (धातूच्या किंवा मातीच्या) गौरी स्थापन करता, परंतु वर्षभर तिचे घरामध्ये योग्य ते पावित्र्य राखले जात नाही. त्यामुळे यापुढे तुम्ही



आपल्या शेतातील केळीच्या पानांपासून गौरी तयार करावी, तिचे दरवर्षी विसर्जन करावे आणि गौरीसाठीचा नैवेद्य हा अगदी साधा व सात्विक असावा,'' असा आदेश त्यांना मिळाला होता.पाचव्या पिढीकडून परंपरेचे जतनहाच आध्यात्मिक वारसा शिरसावंध्य मानून पवार परिवाराने केळीच्या पानांची गौरी बसवण्यास सुरुवात केली. आजच्या आधुनिक काळातही पवार परिवाराची ही पाचवी पिढी तितक्याच श्रद्धेने आणि पवित्रतेने ही परंपरा पुढे चालवत आहे. निसर्गाशी जोडलेली आणि पूर्णपणे पर्यावरणपूरक असलेली ही गौराई संपूर्ण परिसरात नवसाला पावणारी गौरी म्हणून प्रसिद्ध आहे. दरवर्षी या वैशिष्ट्यपूर्ण केळीच्या पानांच्या गौरीचे दर्शन घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक पवार यांच्या निवासस्थानी हजेरी लावतात. अतिशय आकर्षक सजावट आणि पारंपारिक पद्धतीने हा उत्सव साजरा केला जात असून, या निमित्ताने पवार परिवाराने जपलेला हा सांस्कृतिक वारसा कौतुकाचा विषय ठरत आहे.

## देविदासराव जाधव यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील टाकरवन येथील देविदासराव गोपाळराव जाधव (वय ७२) यांचे बुधवारी (दि.१६) अल्पशा आजाराने निधन झाले. धार्मिक प्रवृत्तीचे म्हणून त्यांची या परिसरात ओळख होती. त्यांनी आपले जीवन श्री. दत्त संस्थान टाकरवन व श्री सदानंद संस्थान, मठ नाव्हा या सेवा कार्यात व्यतीत केले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिक्षक संजय जाधव यांचे ते वडील तर आर्ट ऑफ लिव्हिंग प्रशिक्षक सौ. अश्विनीताई जाधव यांचे ते सासरे होत.



# 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी जालन्यात विशेष मोहिम

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त राज्य शासनाच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जालना यांच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणांमधील त्रुटींची पूर्तता करून प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ मध्ये इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी यापूर्वी अर्ज केले आहेत. तसेच ज्या अर्जदारांच्या प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रे किंवा त्रुटींची पूर्तता झालेली नाही आणि प्रकरणे समितीकडे प्रलंबित आहेत, अशा अर्जदारांना या विशेष मोहिमेतून प्रकरणे निकाली काढण्याची संधी देण्यात आली आहे. या कालावधीत कार्यालयात त्रुटी पूर्ततेसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. अर्जदारांनी दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात उपस्थित राहून आपल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग (जात प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० मधील कलम ८ नुसार जातदावा *(पान २ वर)*

# सुख-समृद्धीचा आशीर्वाद घेऊन ज्येष्ठा गौरींचे आगमन

**जालना - प्रतिनिधी**

गौरी-गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील घरोघरी ज्येष्ठा गौरी अर्थात महालक्ष्मी देवींचे मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात आगमन झाले. देवीच्या स्वागतासाठी घरांची आकर्षक सजावट करण्यात आली असून महिलांमध्ये पूजनाची विशेष लगबग पाहायला मिळत आहे.



''नवचैतन्य, सुख-समृद्धीचा आशीर्वाद लक्ष्मीचा, मंगलमय क्षण घेऊन आला हा गौरी-गणपतीचा'' या भावनेने भाविकांनी देवीचे स्वागत केले. पारंपरिक पद्धतीने ज्येष्ठा गौरींची प्रतिष्ठापना करून पूजा-अर्चना करण्यात येत असून शहरात सर्वत्र भक्तिमय आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे. गौरी आगमनामुळे प्रत्येक घरात उत्साहाचे, श्रद्धेचे आणि मंगलमय वातावरण अनुभवायला मिळत असून देवीच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, अशी प्रार्थना भाविकांकडून करण्यात येत आहे.

**(छायाचित्र : नागेश बेनीवाल)**



जालना येथील संभाजीनगर चे डॉक्टर ओमप्रकाश मुळे तसेच बंधू गणेश मुळे यांच्या निवासस्थानी गौरी आगमनाची अशी सजावट करण्यात आली.

# स्वातंत्र्य सैनिकाच्या निवृत्ती वेतनात केंद्र व राज्य असा भेदभाव न करता समान निवृत्ती वेतन मंजूर करा मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी- बाबासाहेब कोलते

**जालना - प्रतिनिधी**

स्वातंत्र्य सैनिकाच्या निवृत्ती वेतनात केंद्र व राज्य असा भेदभाव न करता महाराष्ट्रातील राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना समान निवृत्ती वेतन मंजूर करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्याची मागणी स्वातंत्र्य सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी छत्रपती संभाजीनगर येथे एका निवेदनाद्वारे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्षात भेट घेऊन कोलते यांनी निवेदन देऊन



म्हंटले आहे की, राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना व केंद्र सरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्ती वेतन देतांना केंद्र व राज्य सरकारकडून दुजाभाव होत असून राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी वर यामुळे केंद्र सरकारकडून अन्याय होत आहे. केंद्र व राज्य सरकारने स्वातंत्र्य सैनिकांमध्ये दुजाभाव चालविला आहे. राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना २० हजार रुपये प्रती महा तर केंद्र व राज्य सरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांना ५० हजार रुपये प्रतिमाह शासनाकडून मिळत आहे.

ज्या प्रमाणे केंद्रसरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांना व वारस पत्नी यांना राज्य शासनाची सुद्धा निवृत्ती वेतन मिळते व आज रोजी महाराष्ट्रामध्ये प्रत्येक केंद्र सरकारच्या स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी यांना राज्य सरकारची म्हणजे महाराष्ट्र शासनाची निवृत्ती वेतन सुरु आहे.परंतु राज्यशासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र सरकारचे निवृत्ती वेतन मिळत नाही त्यामुळे केंद्र सरकारकडून महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व स्वातंत्र्य सैनिक वारस पत्नीवर अन्याय होत आहे. व केंद्र शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांनी ज्या प्रमाणे देश हितासाठी काम केले आहे तसे राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांनी सुद्धा देश हितासाठी व मराठवाडा मुक्ती संग्रामासाठी काम केलेले आहे. त्यामुळे राज्य शासन व केंद्र शासन असा दुजाभाव न करता राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र शासनाची निवृत्ती वेतन मंजूर करण्यासाठी केंद्र सरकारकडे राज्य शासनाने शिफारस करून राज्य शासनाच्या महाराष्ट्रातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र सरकारचे निवृत्ती वेतन मंजूर करून न्याय मिळवून द्यावा अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

# लोकसंवादाच्या माध्यमातून नागरीकांना शासकीय योजनांची माहिती

**जालना – प्रतिनिधी**

राज्य शासनामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या अंतर्गतच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधत शासकीय योजना आणि उपक्रमांची माहिती पोहोचविणे हा या 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा उद्देश आहे. गणेशोत्सवाचे निमित्ताने आज दि. १८ सप्टेंबर रोजी जालना तालूक्यातील वडारवाडीचा राजा जय बजरंग गणेश मित्र मंडळ येथे लोकसंवाद-२०२६ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्य, कृषी आणि महिला बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांनी देण्यात आली. जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी डी. एस. बोराडे यांनी यावेळी आरोग्य विभागातील योजनांची माहिती दिली. तर महिला बाल विकास विभागाचे अंमलबजावणी सहाय्यक अधिकारी बी.बी. राठोड, यांनी दिली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विशाल शंकर पवार यांच्यासह या कार्यक्रमास नागरिकांची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.